CNRNO. MHLA150000942019

## नि.क्र. ५ वरील आदेश.

वादींनी सदरचा अर्ज तुर्तातुर्त मनाईहुकूमासाठी आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रीया संहिता अन्वये दिलेला आहे. प्रतिवादी, त्यांचे नोकर-चाकर, कामगार किंवा त्यांच्या वतीने इतर कोणीही दावा मिळकतीतील वादीच्या कब्जेवहीवाटीस दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत अडथळा, हस्तक्षेप करु नये म्हणून तात्पुरता मनाईहुकूम द्यावा अशी प्रार्थना केली आहे.

२. त्याउलट, प्रतिवादी हिला समन्स बजावणी होऊन देखील तिने मुदतीत लेखी जबाबदावा दाखल केला नाही तसेच नि.क्र. ५ वरील अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे सदरचा दावा प्रतिवादी विरोधात विना जबाबदावा व विना म्हणणे पुढे चालविण्याचा आदेश नि.क्र. १ वर पारीत करण्यात आला.

३. वादी व त्यांनी दाखल केलेले दस्तऐवज आणि युक्तीवादावरुन खालील मुद्दे निष्कर्षाकरीता माझ्या समोर उपस्थित झाले. सदर मुद्दयांचे कारणमिमांसा देऊन खालील प्रमाणे निष्कर्ष नोंदविण्यात आलेले आहेत.

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी त्यांचा अर्ज प्रथमदर्शनी सिध्द करतात काय? | ..नकारार्थी. |
| २. | सोय समतोल वादीच्या बाजुने आहे काय ? | ..शिल्लक रहात नाही. |
| ३. | अर्ज नामंजूर केल्यास वादीचे नुकसान होणार आहे काय ? | ..शिल्लक रहात नाही. |

| | | |
|---|---|---|
| ४. | अंतिम आदेश व हुकूमनामा काय ? | ... अर्ज फेटाळण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ४** -

४. मुद्दे क्र. १ ते ३ एकमेकांशी संलग्नीत असल्यामुळे चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते एकत्रीतरित्या चर्चेस घेण्यात आले आहेत.

५. वादीच्या कथनानुसार मौजे कबनसांगवी येथील शिवारात दावा मिळकत जमीन गट क्र. २५३ क्षेत्र १ हे. ५२ आर ज्याच्या पुर्वेस गजानन सांगवे यांची जमीन, पश्चीमेस सुरेश सांगवे यांची जमीन व रस्ता, दक्षीणेस शांताबाई मोतीपवळे व बसवंत गारठे यांची जमीन आणि उत्तरेस जयसिंग दिवे व सुशिलाबाई वडजे यांची जमीन, ही वादीच्या मालकी व ताब्यात आहे. सदर जमीन ही वाद जमीन आहे. वादी क्र. २ ही वादी क्र. १,३,४ व ५ यांची आई आहे. वादी क्र. १,३,४ व ५ यांचे वडील व वादी क्र. २ यांचे पती नामे दादाराव शामराव बाचफल्ले हे दि. २१.०७.२००८ रोजी मरण पावले. त्यांच्या पश्चात वाद जमीन वादीच्या ताब्यात आली. वादी हे दावा जमीनीचे वंशपरंपरागत मालक व ताबेदार आहेत. सदर जमीन ही वडीलोपार्जीत असून वादी क्र. १,३,४ व ५ यांचे आजोबा शामराव परबता बाचीफल्ले यांनी १९६३ साली काशिनाथ शिवलींगअप्पा रा. कबनसांगवी यांच्याकडून मोबदला रक्कम रु. १,००१/- मध्ये खरेदी केली आहे व तेंव्हापासून वादी हे वाद जमीनीचे मालक व ताबेदार आहेत.

६. प्रतिवादी हिचा वाद जमीनीशी कसलाही संबंध नसतांना ७/१२ उता-यावर तिचे नांव असल्यामुळे ती वादीच्या ताब्यास हस्तक्षेप व अडथळा करीत आहे. दि. १३.१२.२०१३ रोजी प्रतिवादी हिने वादीने तिच्या जमीनीत हस्तक्षेप व अडथळा केला म्हणून वादीच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दिली व ती वाद जमीनीची मालक आहे असे सांगितले. पोलीसांनी तपासादरम्यान साक्षीदारांचे बयाण नोंदविले व पंचनामा दि.१७.०१.२०१४ रोजी तयार केला. वादीस वाद

जमीन ही वडीलांपासून आली असून तो वाद जमीनीचा मालक व ताबेदार असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे पोलीसांनी वादीच्या विरुध्द प्रतिवादीने दाखल केलेली फिर्याद दि.०९.१२.२०१३ रोजीची दखल घेतली नाही.

७. दि. १४.१२.२०१८ रोजी वादीच्या ताब्यातील वाद जमीनीत प्रतिवादीने अडथळा व हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला, परंतू वादींनी तिला तसे करण्यास नकार दिला, परंतू तिने ऐकले नाही. म्हणून वादीस दावा दाखल करण्याचे कारण दि. १४.१२.२०१८ रोजी घडले. त्यामुळे वादींनी तात्पुरता मनाईहुकूमाचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली व मनाईहुकूमाद्वारे प्रतिवादींनी किंवा त्यांच्या हस्तकांनी वादींच्या वाद मिळकतीतील ताब्यात अडथळा करण्यापासून प्रतिवादींना पाबंद करण्याची विनंती केली.

८. वादीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे प्रकरणात युक्तीवाद करण्यात आला.

९. अभिलेखाचे अवलोकन केले. वादींनी मनाईहुकूमाच्या अर्जाच्या परि.क्र. ३ मध्ये असे कथन केले की, वादी क्र. १, ३ ते ५ यांचे आजोबा शामराव यांनी वाद मिळकत ही काशिनाथ शिवलींगअप्पा यांच्याकडून सन १९६३ ला रु.१००१/- मध्ये खरेदी घेतली. तेंव्हापासून वादीचे आजोबा व ते मयत झाल्यानंतर वादीचे वडील व वादीच्या वडीलानंतर सर्व वादी यांचा वाद मिळकतीवर मालकी व ताबा आहे. परंतू, वादीने वादपत्रासोबत दाखल केलेल्या ७/१२ उतारा नि.क्र. ८ जो गट क्र. २५३ बाबत आहे याचे अवलोकन केले तर ७/१२ उता-याच्या मालकी रकान्यात वादीची कोणत्याही रकान्यात नोंद नसल्याचे आजच्या घडली दिसून येते. तसेच नि.क्र. ९ नुसार गाव नमुना नं. ८ याचे अवलोकन केले तर प्रतिवादीचे नांव त्या ठिकाणी नमुद आहे. तसेच प्रतिवादीचे नांव वाद मिळकतीच्या ७/१२ उता-यावर सुध्दा नमुद आहे.

१०. वादीचे असे कथन आहे की, त्यांचे आजोबा यांनी सन १९६३ मध्ये वाद मिळकत ही खरेदी केली आहे. परंतू आजच्या घडीला वादीतर्फे वाद मिळकतीचे खरेदीखत हे दाखल करण्यात आलेले नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी वादी हे न्यायालयात स्वच्छ हेतूने आलेले नसल्याचे दिसून येते. तसेच वादी यांनी जुना

स.नं. ४१/आ याच्या सन १९६३ ते १९७९ चा ७/१२ उतारा हा दाखल केला. परंतू या ठिकाणी ही बाब नमुद करणे आवश्यक आहे की, सदरील ७/१२ उतारा ही छायांकित प्रत आहे. तसेच त्या ७/१२ उता-याच्या नमुना नं. १२ मध्ये वादीच्या आजोबाच्या नावाची नोंद ही कोणत्या आधारे आली याबाबतचा उलगडा वादींनी केलेला नाही. वादीतर्फे मराठी रुपांतर केलेली एक पावती जी दि.१०.०४.१९६३ रोजीची दाखल करण्यात आली. त्या पावतीचे आजच्या घडली अवलोकन केले तर ती मोडी लिपीतील पावतीचे मराठी रुपांतर आहे असे त्यामध्ये नमुद आहे. परंतू मुळ मोडी लिपीतील पावती ही वादीने का दाखल केली नाही याबाबतचा कोणताही उहापोह वादींनी केलेला नाही. तसेच त्यापुढेही जाऊन त्या पावतीचे अवलोकन केले तर वादींच्या आजोबांना वाद मिळकतीचा ताबा हा देण्यात आला होता असे त्या पावतीत नमुद नाही असे दिसून येते. वादी यांनी दि. १७.०१.२०१४ रोजीचा पंचनामा प्रकरणात दाखल केलेला आहे. त्या पंचनाम्याचे अवलोकन केले तर सदरील पंचनम्याला प्रतिवादी उपस्थीत होती किंवा पंचनामा करण्यापुर्वी प्रतिवादी यांना नोटीस देण्यात आलेली होती, याबाबतचा कोणताही दस्तऐवज वादीतर्फे दाखल नाही. सदरील चौकशी ही प्रतिवादीच्या माघारी झाल्याचे आजच्या घडली सकृतदर्शनी दिसून येते. तसेच वादीतर्फे वाद मिळकतीच्या लगतच्या शेतक-यांचे शपथपत्र हे अभिलेखावर वादीचा ताबा वाद मिळकतीवर आहे हे दर्शविण्यासाठी दाखल करण्यात आलेले नाही.

११. वरील सर्व बाबी पहाता, वादींचे आजोबा व त्या नंतर वादी हे वाद मिळकतीचे कोणत्या कायदेशिर दस्ताद्वारे मालक व कब्जेदार झाले याबाबतचा कोणताही अधिकृत दस्तऐवज हा वादींतर्फे दाखल करण्यात आलेला नाही. वाद मिळकतीच्या ७/१२ उता-याचे अवलोकन केले तर त्या मिळकतीच्या मालकी रकान्यात प्रतिवादीच्या नावाची नोंद आहे. त्या नोंदीला वादींनी आजपर्यंत कोठेही आक्षेप घेतल्याचे प्रथमदर्शनी अभिलेखाच्या अवलोकनावरुन दिसून येत नाही. या वरील सर्व कारणावरुन प्रथमदर्शनी वादी हे वाद मिळकतीचा मालक व कब्जेदार आहे ही बाब सिध्द करु शकले नाही. वाद मिळकतीच्या ७/१२ उता-यावरुन प्रथमदर्शनी प्रतिवादी ही मालक असल्याचे दिसून येते. त्या कारणाने वादींना

प्रतिवादी विरोधात तात्पुरत्या मनाईहुकूमाच्या आदेशाची मागणी करता येणार नाही. वादी यांनी प्रथमदर्शनी त्यांची बाजु सिध्द केलेली नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर हे नकारार्थी देतो. मुद्दा क्र. १ चे उत्तर हे नकारार्थी दिल्याने मुद्दा क्र. २ व ३ हे चर्चेसाठी शिल्लक रहात नाहीत व मुद्दा क्र. ४ करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**-आदेश -**

वादींचा अर्ज (नि.क्र. ०५) फेटाळण्यात येतो.

PRASHANT PRAKASHRAO KALE

Digitally signed by PRASHANT PRAKASHRAO KALE
Date: 2023.08.04 17:00:39 +0530

(प्रशांत पी. काळे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
चाकूर.

दि.०२.०८.२०२३